# आंतरजातीय विवाहाला गांधीजींचे प्रोत्साहन : डॉ. चौसाळकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशात आंतरजातीय विवाहाची संख्या वाढल्याशिवाय जातीयता नष्ट होणार नाही, हे महात्मा गांधीचे स्वप्न साकारण्यासाठी स्त्रियांनी पुढाकार घ्यावा. मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे. यासाठी गांधीजींनी प्रबोधन केले, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृतिभवनमध्ये ताराराणी विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथी निमित्त, 'महात्मा गांधी आणि स्त्रियांचे प्रश्न' या विषयावर




**कोल्हापूर : सरोजिनीदेवी पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर. डावीकडून अरुण पाडगावकर, एस. एम. पवार, डॉ. रा. कृ. कणबरकर, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, व्ही. पी. पाटील, निकम-पाटील. (छाया : नाज ट्रेनर)**

ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, मुलींना शिक्षण देताना कोणताही भेदभाव न करता, मुलांच्याप्रमाणे शिक्षण द्यावे. घरातही स्त्रियांना पुरुषाप्रमाणे समान हक्क द्यावा, अशी महात्मा गांधीजींची भूमिका होती. ती सत्यात साकारण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवे.

यावेळी अरुण पाडगावकर, एस. एम. पवार, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, व्ही. पी. पाटील, निकम - पाटील आदी उपस्थित होते. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रस्ताविक केले. ए. व्ही. साठे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner